महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक: ३७४(२)/ विद्युत/२०२३/१९** **दिनांक:- १२ ऑगस्ट, २०२४**

## -: प्रसिद्धीपत्रक :-

**विषय:**- महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०२३
**सर्वसाधारण गुणवत्ता यादीबाबत.**
**संदर्भ** :- पूर्व परीक्षा जाहिरात क्रमांक ०११/२०२३, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ व
मुख्य परीक्षा अधिसूचना क्रमांक १२३/२०२३, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२३

महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा- २०२३ या परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक १२ ऑगस्ट, २०२४ रोजी बेलापूर, नवी मुंबई केंद्रावर घेण्यात आल्या आहेत. तद्अनुषंगाने संबंधित उमेदवारांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

२. प्रस्तुत परीक्षेची सदर सर्वसाधरण गुणवत्ता यादी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची आहे. अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी प्रमाणपत्र / कागदपत्रे पडताळणी करताना काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये बदल होऊ शकतो व पर्यायाने उमेदवाराचा गुणवत्ता क्रम बदलू शकतो, उमेदवार अपात्र ठरू शकतो.

३. प्रस्तुत सर्वसाधारण गुणवत्ता यादी विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात समांतर आरक्षण व इतर प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आली आहे.

४. आवश्यक तपासणीनंतर तात्पुरती निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल व त्यावेळी उमेदवारांना भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर पर्याय निवडणाऱ्या उमेदवारांची नावे शिफारसीकरीता विचारात घेतली जाणार नाहीत, अशा उमेदवारांची नावे शिफरसी करीता विचारात न घेता अंतिम गुणवत्ता यादी व अंतिम शिफारस यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

ठिकाण: नवी मुंबई.

उपसचिव (परीक्षोत्तर) (राजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.